दै. प्रजावाणी दि. 17/02/2025

# पोलिसांनी केली ३४ गोवंशाची सुटका





**प्रतिनिधी • नांदेड**

देगलूर नाका भागातील इमरान कॉलनीतील असलेल्या एका घरातील पार्किंगच्या जागेत मोठ्या प्रमाणात गोवंश लपवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे धाड टाकून ३४ गोवंशाची सुटका केली. याप्रकरणी चार जणांविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील गोवंश आरोपीने कोठून आणले किंवा चोरीचे आहेत का, याचा तपास करण्याची मागणी होत आहे. यापूर्वी हिमायतनगर पोलिसांनी जवळपास २५ गोवंशाची सुटका केली होती. त्यानंतर इतवारा पोलिसांनी केलेली ही नांदेड जिल्ह्यातील सर्वांत मोठी कारवाई असल्याचे मानले जाते. रात्री दीड वाजल्यापासून पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली होती. डीवायएसपी सुशील कुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कारवाईचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

देगलूर नाका भागातील काही गोवंश तस्करांनी मोठ्या प्रमाणात गोवंश जमा केले असून ते गोवंश एका घरातील पार्किंगच्या जागेत क्रूर पद्धतीने बांधून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी इम्रान कॉलनीतील एका घरावर छापा मारून तीन पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेल्या गोवंशाची सुटका केली. त्यानंतर अन्य एका घरावर पोलिसांनी धाड मारली. त्या ठिकाणी पार्किंगच्या जागेलाच गोठा बनविण्यात आला होता. त्या ठिकाणी धाड टाकल्यानंतर क्रूर पद्धतीने गोवंश बांधून ठेवल्याचे पोलिसांना आढळले. तेथील गोवंशाची ही सुटका करण्यात आली. अन्य दोन ठिकाणीही पोलिसांनी धाड टाकून गोवंश पकडले. रात्री दीड वाजताच्या कालावधीत सुरू झालेले धाडसत्र बराच काळ सुरू होते. या कारवाईत सुटका केलेल्या गोवंशाची संख्या ३४ असून हे गोवंश ताब्यात घेऊन इतवारा पोलीस ठाण्याच्या मैदानात आणल्या गेले, कायदेशीर कारवाईनंतर ते गोवंश गोशाळेला देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या गोवंशाची किंमत जवळपास ११ लाख एवढी आहे. पोलिसांनी तीन ठिकाणी टाकलेल्या वेगवेगळ्या धाडीत तीन वेगवेगळ्या तक्रारीवरून इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. पोहेकॉ एकनाथ मोकले पोहेकॉ शेख वाजिद, पो.ना. बालाजी चंचलवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शेख फहीम शेख सत्तार इमरान कॉलनी, मो जाकीर फारूख (साईनगर), मो अरबाज मो युसुफ (इमरान कॉलनी), मो निसार मो इस्माईल (खयूम प्लॉट) यांच्याविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात कलम ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सह कलम ३ (५) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.